# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२०४९६/२२/अ.क्र.४१७२/२५/०१

**श्री. नितीन शंकर इगवे**
२११/१६८९, मोतीलाल नगर नं.१,
रोड नं. ४, गणेश मंदिर जवळ,
गोरेगाव (प), मुंबई-४००१०४

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) आर/मध्य**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि-७**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) आर/मध्य व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि-७ यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. नितीन इगवे यांनी दाखल केलेल्या दि.२५.०१.२०२१ रोजीच्या जोडपत्र-अ नुसार सहाय्यक अभियंता (रस्ते) आर/मध्य येथून कार्यादेश क्र.AW-११६ यात एकूण १५ मुद्द्यांची माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) आर/मध्य यांनी दि.१०.०३.२०२१ रोजी अपिलार्थी यांना उत्तरासोबत माहिती प्राप्त करून देण्यासाठी डिजिटल स्वरूपातील सीडीचे चलन शुल्क ५० इतकी कळवले असून अपिलार्थी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते)

आर/मध्य यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप नोंदवीत दि.०८.०३.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि-७ यांनी डिजिटल स्वरूपात सीडीमध्ये १५ दिवसात विनामूल्य माहिती देण्याच्या निर्देशासह अपील अर्ज निकाली काढण्यात आला असून, त्यावर दि.०४.०२.२०२२ रोजी माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. यात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि-७ यांनी जारी केलेल्या निर्देशाचे तात्काळ अनुपालन करण्याचे निर्देशासह व या आदेशाचे अनुपालन झाले असल्यास त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra